प्रेस नोट 									दिनांक १६/०७/२०१९

| | |
|---|---|
| अॅसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री. अजय यशवंत तांबे वय.५५ वर्षे, मंडळ अधिकारी, मंडळ कार्यालय मुरडव रा. उत्कर्षनगर कुवारबाव, ता.जि. रत्नागिरी<br>२) श्री. विश्वंभर पंडीत मुरकुटे वय. ३२ वर्षे, तलाठी सजा तुरळ, रा. आरवली ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरडव, आरवली मुंबई गोवा हायवे ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाच रक्कम | लोकसेवक आरोपी क्रमांक ०१ यांनी ४,०००/-रुपये व आरोपी क्रमांक ०२ यांनी २,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लोकसेवक आरोपी क्रमांक ०१ यांनी ४,०००/-रुपये व आरोपी क्रमांक ०२ यांनी २,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांची मौजे तुरळ गावात त्यांचे व त्यांची मयत आई यांच्या संयुक्तिक नावाने जमिन आहे. सदरची जमिन शासनाने महामार्गाच्या रुंदीकरणाकरीता अधिग्रहण केली आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या मयत आईच्या नावे असलेला जमीनीचा हिस्सा त्यांचे व मयत भाऊ यांचे वारस यांचे नावे जमिनीच्या सातबारा उता-यावर लावण्याकरीता (वारस तपास) तलाठी कार्यालय तुरळ ता. संगमेश्वर येथे अर्ज केला होता. सदर कामाचा पाठपुरावा करणेसाठी त्यांनी मंडळ अधिकारी श्री. तांबे व तलाठी श्री. मुरकुटे यांची भेट घेतली असता मंडळ अधिकारी तांबे यांनी ४०००/-रुपये व लोकसेवक तलाठी मुरकुटे यांनी २०००/-रुपये लाचेची मागणी केली असल्याने तक्रारदार यांनी वरील लोकसेवक यांचेविरुध्द दिनांक १५/०७/२०१९ रोजी लाचेची मागणी केल्याची लेखी तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १६/०७/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये मंडळ अधिकारी श्री. तांबे व तलाठी श्री. मुरकुटे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या अर्जाप्रमाणे वारस तपास होवुन वारसांची नावे सातबारा उता-यावर नोंदविण्याकरीता मंडळ अधिकारी श्री. तांबे यांनी ४,०००/- रूपये व तलाठी श्री. मुरकुटे यांनी २,०००/-रुपये लाचेची मागणी केली.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार लागलीच सापळा आयोजित केला असता, लोकसेवक मंडळ अधिकारी श्री. तांबे व तलाठी श्री. मुरकुटे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची मागणी करुन मंडळ अधिकारी श्री. तांबे यांनी ४,०००/-रुपये व तलाठी मुरकुटे यांनी २,०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना १६.५९ वा. मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरडव, आरवली येथे पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी